Volume - 5 (2025)
Issue - 1 (December)
LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science
ISSN
2583-2549

# हिंदी विषयात आचार्य पदवी प्रदान करण्यात आलेल्या शोध प्रबंधाचा उल्लेख विश्लेषणात पूर्व संशोधनाचा आढावा : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या विशेष संदर्भात

**संशोधक**
**वैशाली रत्नाकर समर्थ**
**Email :** vishalibelge79@gmail.com

**मार्गदर्शक**
**डॉ.रमणिक श्रावण लेनगुरे**
**ग्रंथपाल**
**रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर**
**Email :** ramaniklengure@gmail.com

---

***सारांश :*** *उल्लेख विश्लेषण म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखात पध्दतशीर अभ्यास करणे होय, पेपर, लेख व जर्नल यामधील गुणवत्ता तसेच त्यांनी लिहिलेल्य लेखाचा किती वेळा संदर्भ दिला आहे व उल्लेख विश्लेषणाद्वारे स्पष्ट होतो. प्रस्तुत पेपर मध्ये उल्लेख विश्लेषण पूर्व संसोधनविषयी सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विशेष संदर्भात हिंदी विषयात आचार्य पदवी प्रदान करण्यात आलेल्या शोधप्रबंधाचा उल्लेख विश्लेषणात पूर्व संशोधनाचा आढावा बद्दल अभ्यासपूर्व अध्ययन केले आहे.*

**बिजसंज्ञा :** उल्लेख विश्लेषण पूर्व संशोधन

---

## प्रस्तावना :

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप :

४ ऑगस्ट १९२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हापासून मोठया निष्ठेने विद्यापीठ उच्च शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. आपले विद्यापीठ मध्य भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. केवळ कला, विज्ञान, विधी आणि शिक्षण या चार विद्याशाखा, नागपूर, जबलपूर आणि अमरावती येथील सहा महाविद्यालयाचे व त्यात शिकणारे ९१७ विद्यार्थी यांनी सुरु झालेल्या या विद्यापीठाचा आजचा विशाल विस्तार सर्वांना स्तिमित करणारा आहे.

सन २००५ ला विद्यापीठाला राष्ट्रसंताचे नाव प्राप्त झाल्यापासून एक वेगळीच झळाळी या विद्यापीठाला प्राप्त झाली आहे विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्व विकासावर आणि स्वालंबी शिक्षणावर विद्यापीठाने स्वतंत्रपणे आपले विचार वेळोवेळी प्रगट केले आहेत.

### हिंदी भाषा :

हिंदी भाषा केवळ भारतातूनच नाहीतर संपूर्ण संसाराची तीसरी महत्वपूर्ण भाषा आहे. हिंदी भाषा भारतामध्येच नाहितर मॉरीशस, फिजी, गुयाना, सुनीराम इ. विदेशी राष्ट्रामध्ये बोलली जातात.

हिंदी भाषा बोलने व समजणारे याची संख्या ७० टक्के आहे. शाळा मध्ये देखील हिंदी विषय देण्यात आलेला आहे. माननीय शिवसागर रामगुलामजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये हिंदी भारताची राष्ट्रभाषा असून ती अधिक महत्वाचे म्हणजे ती आंतरराष्ट्रीय भाषा आहे. असे मत व्यक्त केले. त्यामुळे या भाषेचा अभ्यास करणे व ही भाषा शिकणे महत्वाचे आहे.

**शोध प्रबंध :**

नागपूर विद्यापीठाच्या संदर्भात षोध प्रबंधाचे विवेचन केल्यास असे दिसुन येते की, संषोधनातुन एक उत्कृष्ठ असे संशोधकांची निर्मिती करणे त्यांना प्रोत्साहित करणे ज्ञानात भर करणे. हे विद्यापीठाचे ध्येय आहे. नागपूर विद्यापीठामध्ये मराठी हिंदी, इंग्रजी, संस्कत, उर्दु, अर्थशास्त्र सोशल सायन्स अश्या वेगवेगळया विभागातील शोध प्रबंध आहेत. जास्त प्रमाणात बघायला मिळतात. हिंदी विशयातील शोंध प्रबंधाचा अभ्यास केला असता नागपूर विद्यापीठामध्ये जास्तीत जास्त हिंदी शोध प्रबंध सादर करण्यात आलेले आहे. १९८२ ते १९२४ या कालावधीत आतापर्यंत २१० शोध प्रबंध सादर करण्यात आलेले आहेत. हिंदी विषयात शोध प्रबंधामध्ये साहित्य कथा, कादंबरी उपन्यास नाटक अश्या वेगवेगळया वाडमय साहित्याव्दारे माहिती देण्यात आलेली आहे.

**उल्लेख विश्लेषण :**

नविन माहिती देणा—या लेखाचे निर्देशन तयार होतात व त्या लेखातून अन्य लेखाचे उल्लेख असतात. उल्लेखलेल्या लेखाचे जे विश्लेषण (Analysis) केले जाते त्याला (Cition Anylasis) उल्लेख विश्लेषण असे म्हणतात. आपल्या लेखात अन्य लेखकांच्या लेखाचा उल्लेख करतो तेव्हा त्याला दोन्ही लेखात जवळचा संबंध असतो. यामुळे लेखकाचा आधी या विषयावर कोणी किती माहिती मिळवली याची कल्पना येते.

Cition Anylasis द्वारे समजण्यायोग्य असे निर्णय घेता येतात. नियतकालिक दिर्घकाळपर्यत कोणते जतन करून ठेवावे हे Cition Anylasis मुळे कळतात. विविध ज्ञानशास्त्राच्या संदर्भात Cition Anylasis द्वारे एखाद्या विषयाचा विकास कसा होत गेला तो पाहता येतो. लेखाचे मुल्यमापन करता येतो.

उल्लेख/उध्दरण साहित्य हे वैज्ञानिक साहित्याचा मुलभूत स्वरूपापैकी एक आहे. उल्लेख विश्लेषणामध्ये गणितीय सा़ंख्यकिय तुलना प्रेरणा सामन्यीकरण ताकीक पध्दतीचा अवलंब उल्लेख विश्लेषणात केला जातो.

**संदर्भ उल्लेखाचे महत्व :**

लेखनामध्ये लेखक आधीच्या लेखकांचा संदर्भ देण्याची कारणे आहेत. अनेक कारणामुळे दुर्लक्षित राहिलेले संबोधन कार्य उजेडात आणणे.

सांप्रत विषयाची पार्श्वभूमी लक्षात येण्यासाठी आधीच्या ग्रंथाचा किंवा लेखाचा उल्लेख करणे होय.

प्रकाशनामध्ये मांडल्या गेलेल्या प्रथम संकल्पानाचा शोध घेणे हो Cition Anylasis च्या आधारे उपभोक्त्यांचा माहिती विषयक गरजा जाणून घेता येतात आणि ग्रंथ आणि ग्रंथेत्तर संग्रहाचा विकास साधता येतो.

- प्रलेख प्रकाशित होऊन लोटलेला काळ
- ग्रंथालयातील प्रलेखाची आवश्यकता
- प्रकाशन स्थळ प्रकार

**प्रलेखाचा प्रकार :**

प्रलेखाची भाषेचा प्रकार इ. कारणे हे संबंधित विषयाचा संदर्भात लेखक उल्लेख करतात असे नाही उल्लेख न होणे हे वरील कारणे आहेत.

**पूर्व संशोधन म्हणजे :**

संशोधन साहित्याचा आढावा म्हणजे एखाद्या विषयाशी किंवा संशांधनासंबंधी प्रश्नाचा स्त्रोतांचे व्यापक स्वरूपात मुल्यांकन करणे होय. चिंतनशील विचाराचे मुळे हे समस्येमध्ये दडलेले असते. हे समस्या जर शास्.ीय पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न केला तर, ती समस्या ख—या अर्थाने संशोधनामध्ये विषय ठरू शकतो. विषयाशी संबंधीत अगोदारच्या संशोधकांनी ज्या संशोधनामध्ये उल्लेख केला असेल याच क्षत्रात आधी जे काही संशाधन झाले असेल त संशोधन म्हणजे पूर्व संशोधन होय. यात समस्येशी संबंधीत जे कार्य अगोदरची साहित्य निर्मिती झाली असेत ते सर्व साहित्य म्हणजे पुर्व संशाधन होय.

**संशोधनाचा आढावा घेण्याचे फायदे :**

पूर्वी झालेल्या संशोधनाचा व आपल्या विषयाचा संबंधीत साहित्याचा आढावा घेतल्यामुळे खालील फायदे होतात.

- संशोधनाची गृहितके निश्चित करण्यासाठी पूर्व संशोधनाचा अभ्यास उपयुक्त व मार्गदर्शन ठरतो.
- पूर्व संशोधनाचा पूनरावृत्ती टाळून उचित समस्या निवडण्यास मदत होते.
- संशोधन समस्येशी पूनरावृत्ती टाळता येते.
- पूर्व संशोधनाच्या आढाव्याने वेळेची व श्रमाची बचत होते.

**संशोधन साहित्याचे पूनरावलोकन :**

- **शेख रहिसा** यांनी मराठी विषयातील आचार्य पदवी प्रंबधातील उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास १९९० ते २००५ या प्रंबधात १२५ शोध प्रबंधामध्ये उल्लेखीत संदर्भसूची मधून ग्रंथाचे आकडेवारीचे वर्गीकरण, तक्ता आलेखाकृती वतूळाकृती व्दारे माहिती देण्यात आलेली आहे.

एकूण पुस्तकांच्या भाषेपैकी सर्वात जास्त मराठीच्या ७७९७ पुस्तकांचा उल्लेख प्रबंधामध्ये मराठी विषयात १९९० ते २००५ या कालावधीमध्ये १२५ प्रबंधकांना आचार्य पदवी प्राप्त झालेली आहे. यांचा शोधप्रबंधचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

- **बटुके, विठ्ठल दशरथ** यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विषयातील उल्लेख विश्लेषणात्मक अभ्यास यामध्ये त्यांनी मराठी प्रबधामध्ये असलेल्या साहित्याचे विवरण, भाषेनुसार कालानुक्रमे विवरणात अभ्यास करणे मराठी भाषा प्रबंधामध्ये Style Manual यांचा शोध घेणे माहिती संकलणासाठी वापरण्यात येणा—या साहित्य प्रकाराच्या त्याच्या साहित्यानुसार अभ्यास केलेला दिसून येतो.

- **म्हस्के सविता माधव** यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील व्रातविद्या विषयात आचार्य पदवी प्रबधातील उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास (१९८५ — २०११) या शोध प्रबधामध्ये यांनी एकुण उल्लेख विश्लेषणामध्ये ५०२१८ उल्लेखांचा अभ्यास केलेला दिसुन येतो. ग्रंथमापन संशोधन पदधतीनुसार अभ्यास करणे ग्रंथ व नियतकलिक यांचा हाफ लाईन व्दारे प्रंबधाची माहिती दिलेली आहे.

- **देशपांडे निला आणि राजलक्ष्मी** (१९९६) — यांनी Citation Study of de cementation in Library and Information Science या संशोधन लेखात १९९० ते १९९४ मधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यास क्रमाकरीता सादर केलेल्या शोधनिबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रलेखाचे प्रकार लेखकानुसार व कालगणनेनुसार विश्लेषण करण्यात आलेले आहे.

- **देव एन १९९५** — यांनी Bibliometric Study of doctoral dissertation on English Language and literature या संशोधन लेखात ग्रंथमापन अभ्यास करतांनी त्यांनी १९९४ पर्यंतच्या सर्व प्रंबधातील साहित्यानुसार, देशानुसार, भाषेनुसार, वर्षनुसार विश्लेषण केलेले आहे.

- **हिरवाडे एम.ए. आणि धनखडे एस.एस.** २००२ यांनी Citation Analysis of Doctoral research in economics या संशोधन अर्थशास्त्रातील २३ प्रंबधामधील उल्लखाचे विश्लेषण केलेले आहे. त्यामध्ये साहित्याचे प्रकारानुसार विश्लेषण केले व हाफ लाईन व्दारे विश्लेषण केलेले आहे.

- **अरविंद पी.** १९९६ यांनी The literature of Physical an Theology A Citation analysis या संशोधन प्रकल्पा मध्ये उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

- **Gandthade P** (2012) Citation Analysis of Doctoral dissertation in Commerce awarded by RTM Nagpur University**.**

प्रस्तुत षोधप्रबंधात संषोधकाने रा.तु.म. नागपूर विद्यापीठामध्ये वाणिज्य विशयात सादर

षोधप्रबंधाच्या उल्लेखाचे विष्लेशण केलेले आहे. या अभ्यासाकरिता संषोधकाने २००० – २००५ या कालखंडातील एकुण १३१ षोध प्रबंधातुन B ६९० उल्लेखाचे विष्लेशण केलेले आहे. यावरुन असे निर्देषनास आले की, विशयानुसार विष्लेशणात सर्वात जास्त च्तवकनबजपवद म्बवदवउपबे विशयानुसार २५ (१९.०८) टक्के षोध प्रबंध तर, सर्वात कमी Printing and International Economics फक्त १ (०.७६) षोध प्रबंध आहेत. स्ंदहनंहम ूपेम क्पेजतपइनजपवद मध्ये प्रथम क्रमांक इंग्रजी ७८ (५९.५४) टक्के त्यांनतर मराठी ५१ (३८.९३) टक्के आणि हिन्दी ०२ (१.५३) टक्के षोध प्रबंध आहेत तसेच या संषोधकाने या षोध प्रंबधात Rank list Authorship Pattern Chanonological Distribution S. Table and Graph च्या सहायाने विष्लेशण केलेले आहे.

- **इरखेडे दि** (२००७) रा.तु.म. नागपूर विद्यापीठाषी संलग्नित षिल्पषास्त्र महाविद्यालयात (बी आर्च) मध्ये सादर लद्युषोध प्रबंधाचा उल्लेख विष्लेशणात्मक अभ्यास. प्रस्तुत संषोधन रा.तु.म. नागपूर विद्यापिठाषी संलग्नीत षिल्पषास्त्र (बी आर्च) मध्ये सादर लद्युषोध प्रबंधाचा उल्लेख विष्लेशणात्मक अभ्यास आहे यामध्ये संषोधकाने २००४ ते २००६ या दोन वर्श कालावधीतील एकुण १३० लद्युषोध प्रबंधातून १२७३ उल्लेख प्राप्त केलेले आहे. या संषोधनात असे निर्देषनास आले की, एन.एच.मानापुरे या मार्गदर्षकाने दोन महाविद्यालयामध्ये वेगवेगळया विदयार्थ्याना मार्गदर्षन केले आहे.

- Gupta R (2001) Ciation Analysis of Ph.D. Awarded in the Subject Chemistry from Postgraduate teaching and Research Department of Chemistry Nagpur University Nagpur. हा लद्युषोध प्रबंध यषवंतराव चव्हाण महाराश्ट्र मुक्त विद्यापीठाचा सादर १९९१ – १९९५ या काळातील रसायनषास्त्र षोधप्रबंधाचे उल्लेख विष्लेशणाचा अभ्यास आहे. संषोधकाने एकुण २३ प्रबंधाचा अभ्यास केला असून यामध्ये एकुण ५८२१ उल्लेख आढळुन आले.

या लद्युषोधप्रबंधात संषोधकाने श्रवनतदंस त्ंदापदह जर्नल्सने भाशेनुसार विष्लेशण तसेच विशयानुसार विष्लेशण केले आहे. भाशेनुसार विष्लेशणात जे सर्वात जास्त ५५२१ उल्लेख असल्याचे आढळुन आले.

**निष्कर्ष :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे संशोधन करणा—या संषोधनासाठी एक उपयक्त असे व्यासपीठ आहे. हिंदी विषयात आता पर्यत झालेल्या शोध प्रबंधाचा अभ्यासात असे दिसुन येते की, हिंदी भाशेचे राष्ट्रीय महत्व प्राप्त करण्यासाठी आंदोलन प्रचार व्दारे जनतेमध्ये राष्ट्रीय भावना कषी निर्माण झाली या विषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

पूर्व संशोधनाच्या अभ्यासामुळे संशोधन कर्त्याला योग्य माहिती व संशोधन कार्याला योग्य दिषा प्राप्त होते. पूर्व संशोधनामुळे तुलनात्मक माहिती, संशोधन पध्दती व तंत्राबद्यल निष्चित कल्पना मिळते.

## संदर्भसुची


- पवार एस.पी – इतर ग्रंथालय व माहिती शास्त्र कोल्हापूर फडके प्रकाशन
- शेख रहिसा – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील मराठी विषयात आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास १९९० ते २००५ व २०१२
- डॉ. तिवारी भोलानाथ हिन्दी भाशा किताब मील इलाहाबाद १९६२
- डा़ॅ. मिश्र रामेश्वर राश्ट्रभाशा हिन्दी का स्वरुप विधान भारतीय ग्रंथ निकेतन दिल्ली १९६५.
- डॉ. धोंड श्याम मानव, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' नागपूर विद्यापीठ वार्षिक अहवाल २०१९ – २० रा.त.म. नागपूर विद्यापीठ नागपूर जुलै २०२१.
- Garfield & Scientograpy : Mapping the track of Science Current Contents : Social and Behaviour Science 7, 45 (1994) 5-10